# पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई, महाराष्ट्र

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेस नोट

### पैशांच्या कारणावरुन मित्राचे शिर धडावेगळे करुन खुन करणाऱ्या आरोपीला पनवेल शहर पोलीसांनी ठोकल्या बेड्या

पनवेल शहर पोलीस ठाण्यास दिनांक 28/06/2023 रोजी पासुन पनवेल येथुन इसम नामे महंमद अस्लम हाश्मद वय 42 वर्षे, राह- आशीयाना अपार्टमेंट, रु.नं. 01, जुने कोर्टजवळ, पनवेल हा मिसींग असलेबाबत मुक्कर्रम कसार राह- नेरुळ यांनी पोलीस ठाणे येथे दिलेल्या खबरीवरुन मोठे मनुष्य मिसींग नं. 68/2023 अन्वये दाखल होती.

सदर मिसींगच्या तपासकामी श्री. मिलींद भारंबे, मा. पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई, श्री. संजय मोहीते, मा. पोलीस सह आयुक्त सो, नवी मुंबई, श्री. पंकज डहाणे मा. पोलीस उपायुक्त सो, परि 02, पनवेल, नवी मुंबई. श्री. अशोक राजपुत, सहा. पोलीस आयुक्त सो, पनवेल विभाग, नवी मुंबई, श्री नितीन ठाकरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई, श्री. अंजुम बागवान, पोलीस निरीक्षक, श्री. प्रमोद पवार, पोलीस निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे यांच्याकडुन प्राप्त सुचना व मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाण्याकडील सपोनि बजरंग राजपुत व पोहवा/1726 हनुमंत अहिरे, सहा. पोउपनि योगेश मैड, पोहवा/1624 चेतन पाटील, पोहवा/2170 मनोज पाटील, पोशि/3705 धर्मेश म्हात्रे यांचे तपास पथक तयार करण्यात आले. सदर पथकाने दिवस रात्र अथक परिश्रम करुन मिसींग व्यक्तीच्या शोधकामी मिसींग व्यक्तीचे मोबाईलचे सीडीआर, मिसींग झाले ठिकाणच्या परिसरातील प्राप्त केलेले सीसीटीव्ही फुटेज यांचा तांत्रीक तपास केला. तपासादरम्यान यातील मिसींग व्यक्तीला त्याचा मित्र नामे शफिक हैदर याच्या सोबत शेवटचे पाहिले असल्याबाबत माहिती समोर आली. त्यावरुन शफिक हैदर याच्याबाबत तपास केला असता तो वडघर, पनवेल येथुन अचानक त्याचा मोबाईल बंद करुन मुळ गावी उत्तरप्रदेश येथे जात असल्याबाबत माहिती समोर आली. त्यावरुन शफिक अली हैदर याच्याबाबत अधिक तांत्रीक तपास करुन त्यास तपासपथाकाने भोपाळ, मध्यप्रदेश येथे रेल्वेतुन विचारपुस करण्यासाठी थांबिवले. त्याच्याकडे यातील मिसींग व्यक्तीबाबत अधिक तपास केला असता त्याने उडवाउडवीची उत्तरे देऊन दिशाभुल करत असल्याचे दिसुन आले. त्यावरुन मिसींग व्यक्तीचे काहीतरी बरेवाईट झाले असल्याबाबत संशय बळावला.

शफिक अली हैदर याच्याकडे तपासपथकाने केलेल्या तपासामध्ये त्याने महंमद अस्लम हाश्मद वय 42 वर्षे याच्या बरोबर पैशांच्या कारणावरुन झालेल्या भांडणाचा व शिवीगाळीचा राग मनात धरुन दिनांक 28/06/2023 रोजी पहाटे 02.00 चे 03.00 वा. च्या दरम्यान शॉप नं. 01, दिप एन्टरप्राईजेस बिल्डींग, प्लॉट नं. 66, सेक्टर आर-1, चिंचपाडा, पुष्पक नोड, वडघर, ता- पनवेल या ठिकाणी अस्लम याचे मानेवर मासे कापण्याच्या सुऱ्याने वार करुन त्याचे मुंडके धडावेगळे करुन खुन केला तसेच खुनाचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याचे धड 3/4 नायलॉनच्या गोणी एकात एक भरुन प्रेत भरुन चिंचपाडा, कळंबोली सर्वीस रोडचे डावे साईडला रस्ताचे कडेला टाकुन दिले व मुंडके करंजाडे येथील नाल्यात टाकले असल्याचे सांगितले.

शफिक अली हैदर याने दिलेल्या कबुलीप्रमाणे तसेच सांगितलेल्या हकिकतीप्रमाणे त्याच्या विरुद्ध सरकारतर्फे पोहवा/1726 हनुमंत अहिरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा रजि नं. 414/2023 भादवि कलम 302, 201 प्रमाणे दिनांक 14/07/2023 रोजी 23.37 वा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात आरोपीत शफिक अली हैदर वय 43 वर्षे, राह- वडघर, पनवेल, मुळ राह- सिद्धार्थनगर, उत्तरप्रदेश यास अटक करण्यात आली असुन आरोपीत याच्याकडे केलेल्या तपासात त्याने मयताचे धड ज्या ठिकाणी टाकले सदरचे ठिकाण दाखवले त्याप्रमाणे आरोपीत याच्या सांगण्याप्रमाणे मयताचे मुंडके नसलेले धड मिळुन आले आहे. सदरचे धड शवविच्छेदनाकरीता उपजिल्हा रुग्नालय, पनवेल येथे पाठवण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास श्री. नितीन ठाकरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई हे करत आहेत.